पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

मा.महिला व बालकल्याण समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १६**

सभावृत्तांत

दिनांक - **०९/०९/२०२१** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची **पाक्षिक** सभा **गुरुवार** दिनांक **०९/०९/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि. ०३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे काही सन्मा.सदस्य सभागृहात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

**१. मा.लोखंडे चंदा राजू - सभापती**

२. मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३. सविता बाळकृष्ण खुळे

४. मा.राजापुरे माधवी राजेंद्र

५. मा.गायकवाड निर्मला मनोज

६. अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.अजय चारठाणकर - उप आयुक्त, मा.सुहास बहाद्दरपुरे - समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.२) आत्मिक शक्ती वृद्धिगत करुन जनमाणसात नवचैतन्य जागृत करणारा जागर स्त्री शक्तीचा हा आगळावेगळा उपक्रम राबविण्याबाबत - मा. निर्मला गायकवाड, मा.योगीता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक २६/०८/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र. १५) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ४४ विषय क्रमांक - ०१

दिनांक - ०९/०९/२०२१ विभाग- नागरवस्ती

सुचक - मा.सविता खुळे अनुमोदक - मा.माधवी राजापुरे

संदर्भ - मा.उप आयुक्त, नागरवस्ती विकास योजना विभाग यांचेकडील पत्र क्र.नावियो/०२/कावि/५६/२०२१, दिनांक - ०४/०८/२०२१

विषय - जागतिक महिला दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिक्तेर्फे आयोजित केलेल्या “WE YUVA” चॅलेंज स्पर्धेबाबत.

विषय क्र.१ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४५ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०९/०९/२०२१

सुचक - मा.निर्मला गायकवाड अनुमोदक - मा.योगीता नागरगोजे

संदर्भ - मा.निर्मला गायकवाड व मा.योगीता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

आत्मिक शक्ती वृद्धिगत करुन जनमाणसात नवचैतन्य जागृत करणारा जागर स्त्री शक्तीचा सर्वांगिण विकास, तणावमुक्ती व सृजनशीलतेला वाव देण्यासाठी आपल्या मार्फत व आपल्या आखत्यारित न्यासा ह्युमन डेव्हलपमेंट आणि रिसर्च सेंटरने उपक्रम हाती घेण्याची इच्छा दर्शविली आहे. खालील विषयी आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या म्युझिक हिलर, सक्सेस कोच, आय.टी.उद्योजिका साधना योगलक्ष्मीजी या प्रशिक्षण देणार आहेत. त्या वरिल संस्थेच्या संस्थापिका आहेत.

| अ.क्र. | तपशील | मानधन |
|---|---|---|
| १. | "जागर स्त्री शक्तीचा" कार्यक्रम<br>१) स्वच्छता जागृती व आंतरिक संतुलन (वेळ १तास ३० मिनीट)<br>२) तणावमुक्ती (वेळ ३० मिनीट)<br>३) ध्येय निश्चिती (वेळ ३० मिनीट)<br>४) आत्मनिर्भरता (वेळ ३० मिनीट)<br>५) संगीत साधना (वेळ १ तास)<br>(अर्धा तासाचा ब्रेक असेल) | ५,६६,०००/- |
| | लागणारे अंदाजे खर्च - (मान्यवरांचे मानधन, प्रवास खर्च, साऊंड इंजिनिअर साऊंड सिस्टीम, ३ म्युजिशियन, आयोजक आणि स्वयंमसेवक) | |

खालील प्रमाणे -

१) दिव्यांग / शेतकरी कुटुंब तणावमुक्ती

२) किशोरवयीन मुली / महिलांना संगीतातून समूपदेशन

३) मुलींची तांत्रिक / व्यावसायिक कौशल्यवृद्धी

४) ग्रामीण भागातील मुलींचे स्वसंरक्षण, आत्मसन्मान व मनोबल वाढविणे

यासाठी जागर शक्तीचा हा कार्यक्रम आपल्या मार्गदर्शनाखाली आयोजित करणेकामी मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कार्यक्रमाच्या खर्चास मान्यतेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( लोखंडे चंदा राजू )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/४३३/२०२१
दिनांक : १३/०९/२०२१



**(** उल्हास बबनराव जगताप **)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.